<u>नवी मुंबई महानगरपालिका</u>

<u>महापालिका सर्वसाधारण सभा</u>

महानगरपालिकेच्या बुधवार, दिनांक 20/01/2016 रोजी भरलेल्या माहे जानेवारी महिन्याच्या सर्वसाधारण सभेत मंजूर/नामंजूर इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसुदा स्वरुपात खालीलप्रमाणे आहे. :-

| | |
|---|---|
| **विषय क्र. 01.**<br>**दिनांक 20 जानेवारी 2016** | महानगरपालिकेचे दिनांक 24 ऑगस्ट 2015, दिनांक 25 ऑगस्ट 2015, दिनांक 09 सप्टेंबर 2015, दिनांक 14 सप्टेंबर 2015, दिनांक 14 ऑक्टोंबर 2015, दिनांक 17 ऑक्टोंबर 2015, दिनांक 04 नोव्हेंबर 2015, दिनांक 20 नोव्हेंबर 2015, दिनांक 08 डिसेंबर 2015 दिनांक 18 डिसेंबर 2015 रोजीचे इतिवृत कायम करण्यात आले. |
| **निर्णय -** | <u>मंजूर</u> |
| **विषय क्र. 03.**<br>**दिनांक 20 जानेवारी 2016** | **(अ)** महापालिका सचिव यांजकडून मा. महापौर यांस आलेले दिनांक 12/01/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/मस/45/2016 :-<br>**(ब)** उदयान व शहर सुशोभिकरण समितीवर रिक्त झालेल्या एका जागेसाठी उर्वरित कालावधीकरिता नामनिर्देशनाद्वारे सन्मा. सदस्याची नियुक्ती करणे. |
| **<u>ठराव क्र. 751.</u>**<br>**दिनांक 20 जानेवारी 2016** | नवी मुंबई महानगरपालिकेच्या उद्यान व शहर सुशोभिकरण समितीवर एका रिक्त होणा-या सदस्य पदावर **<u>श्रीम. शिल्पा सूर्यकांत कांबळी,</u>** यांची उर्वरित कालावधीकरिता नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येत आहे |
| **निर्णय -** | **<u>मंजूर.</u>** |
| **विषय क्र. 04.**<br>**दिनांक 20 जानेवारी 2016** | नवी मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील समाजसेवक या पदाच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 30/11/2015 चे पत्र क्र. नमुंमपा/प्रशा/आस्था-1 /प्र.क्र. 417/3963/2015. |
| **<u>ठराव क्र. 752.</u>**<br>**दिनांक 20 जानेवारी 2016** | नवी मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील समाजसेवक या पदास वेतनश्रेणीत सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनबँड रु. 5200-20200 + ग्रेड पे रु. 2800 ऐवजी वेतनबँड रु. 9300-34800 + ग्रेड पे रु. 4200 अशी सुधारणा करण्यास, प्रस्तावात नमुद करण्यात आलेल्या बाबींसह, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 51(4) अन्वये, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी |
| **निर्णय -** | <u>मंजूर</u> |

| | |
|---|---|
| **विषय क्र. 05.**<br>**दिनांक 20 जानेवारी 2016** | नवी मुंबई महानगरपालिका बेलापूर भवन, आयुक्त निवास, महापौर निवास, अग्निशमन केंद्र सी.बी.डी., नेरुळ, वाशी, ऐरोली, गौरव म्हात्रे कलाकेंद्र, उपकर विभाग, मालमत्ता कर विभाग येथील हाऊस किपींग कामाबाबतच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 17/12/2015 चे पत्र क्र. नमुंमपा/घकव्या/946/2015. |
| **<u>ठराव क्र. 753.</u>**<br>**दिनांक 20 जानेवारी 2016** | नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रअंतर्गत बेलापूर भवन, आयुक्त निवास, महापौर निवास, अग्निशमन केंद्र सी.बी.डी., नेरुळ, वाशी, ऐरोली, गौरव म्हात्रे कलाकेंद्र, उपकर विभाग, मालमत्ता कर विभाग येथील हाऊस किपींग कामासाठी कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. 60 लाख, 84 हजार, 442 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी. |
| **निर्णय -** | <u>मंजूर</u> |
| **विषय क्र. 06.**<br>**दिनांक 20 जानेवारी 2016** | ठाणे-बेलापूर रोडवरील तुर्भे रेल्वे स्टेशन समोर दोन फुटओव्हर ब्रिज (FOB) बांधण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 18/12/2015 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./1511/2015. |
| **<u>ठराव क्र. 754.</u>**<br>**दिनांक 20 जानेवारी 2016** | ठाणे-बेलापूर रोडवरील तुर्भे रेल्वे स्टेशन समोर दोन फुटओव्हर ब्रिज (FOB) बांधण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. 3 कोटी, 12 लाख, 92 हजार, 352 मात्र इतक्या खर्चास, नियमानुसार देय असलेल्या भाववाढीपोटी वाढीव रक्कमेस, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी. |
| **निर्णय -** | <u>मंजूर</u> |
| **विषय क्र. 07.**<br>**दिनांक 20 जानेवारी 2016** | भूखंड क्र. 71, 72, 73, से. 11 सी.बी.डी. बेलापूर येथील पार्किंग व कॅफेटेरीया मधील किऑक्स (Kiosk) 05 वर्षाकरीता परवानगी व अनुज्ञा (लिव्ह ॲन्ड लायसन्स) तत्वावर देणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 18/12/2015 चे पत्र क्र. नमुंमपा/मालमत्ता/ 1614/2015. |
| **<u>ठराव क्र. 755.</u>**<br>**दिनांक 20 जानेवारी 2016** | भुखंड क्र. 71, 72, 73 से. 11, सी.बी.डी., बेलापूर येथील पार्किंग व कॅफेटेरीया मधील किऑक्स (Kiosk) प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह तक्ता क्र. 02 मध्ये नमूद व्यक्ती/संस्था यांनी स्तंभ क्र. 07 मध्ये जास्तीत जास्त सुरक्षा अनामत रक्कम नमूद केली असल्यामुळे संबंधितास स्तंभ क्र. 05 मध्ये नमुद केलेल्या |

| | |
|---|---|
| | मासिक भाडेदराने 05 वर्षाच्या कालावधीकरीता दरवर्षी 10% भाडे वाढीसह किऑक्स (Kiosk) "परवानगी व अनुज्ञा" (लिव्ह ॲन्ड लायसन्स) तत्वावर निविदेत नमूद केलेल्या अटी व शर्तीप्रमाणे देण्यास, प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 79 (क) अन्वये, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी. |
| **निर्णय -** | <u>मंजूर</u> |
| **विषय क्र. 08.**<br>**दिनांक 20 जानेवारी 2016** | नवी मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारितील दुकान गाळे/कार्यालये 05 वर्षाकरिता परवानगी व अनुज्ञा (लिव्ह ॲन्ड लायसन्स) तत्वावर देण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 18/12/2015 चे पत्र क्र. नमुंमपा/मालमत्ता/1615/2015. |
| **<u>ठराव क्र. 756.</u>**<br>**दिनांक 20 जानेवारी 2016** | नवी मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीतील भुखंड क्र. 160, से. 44, करावे येथील दुकान गाळे/कार्यालये प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह तक्ता क्र. 02 मधील नमूद व्यक्ती यांनी स्तंभ क्र. 06 मध्ये जास्तीत जास्त सुरक्षा अनामत रक्कम नमूद केली असल्यामुळे संबंधितास स्तंभ क्र. 04 मध्ये नमुद केलेल्या मासिक भाडेदराने 05 वर्षाच्या कालावधीकरीता दरवर्षी 10% भाडे वाढीसह किऑक्स (Kiosk) "परवानगी व अनुज्ञा" (लिव्ह ॲन्ड लायसन्स) तत्वावर निविदेत नमूद केलेल्या अटी व शर्तीप्रमाणे देण्यास, प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 79 (क) अन्वये, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी |
| **निर्णय -** | <u>मंजूर</u> |
| **विषय क्र. 09.**<br>**दिनांक 20 जानेवारी 2016** | नवी मुंबई महानगरपालिकेस सार्वजनिक प्रयोजनासाठी केंद्र शासन, महाराष्ट्र शासन, सिडको व एम.आय.डी.सी., यांचेकडून प्राप्त झालेल्या /मागणी केलेल्या भुखंड/मिळकती बाबत दिनांक 30/06/2014 मा. महापालिका सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. 609 मधील सिडकोकडे मागणी करण्यात आलेल्या भुखंडाच्या तपशीलात अशंत: बदल करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 16/12/2015 चे पत्र क्र. नमुंमपा/मालमत्ता/1617/2015 |
| **<u>ठराव क्र. 757.</u>**<br>**दिनांक 20 जानेवारी 2016** | नवी मुंबई महानगरपालिकेस सार्वजनिक प्रयोजनासाठी केंद्र शासन, महाराष्ट्र शासन, सिडको |

| | |
|---|---|
| | व एम.आय.डी.सी., यांचेकडील प्राप्त झालेल्या/मागणी केलेल्या प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह भुखंड क्र. 61अे ते 61आय, सेक्टर 14, कोपरखैरणे, क्षेत्रफळ 930.88 चौ.मी. आरक्षित वापर **"निवासी"** मागणी करण्यात आलेले प्रयोजन **"पार्किंग"** यामध्ये अंशत: बदल करुन **"भुखंड क्र. 61अे ते 61आय, सेक्टर 14, कोपरखैरणे"** ऐवजी **"भुखंड क्र. 61अे ते 61डी, सेक्टर 14, कोपरखैरणे क्षेत्रफळ 426.12 चौ.मी."** या बदलास, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी |
| **निर्णय -** | आयुक्तांकडे परत |
| **विषय क्र. 10.**<br>**दिनांक 20 जानेवारी 2016** | FIFA UNDER-17 WORLD CUP INDIA 2017 करिता महानगरपालिकेच्या अखत्यारित्यातील मैदान विकसित करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 19/12/2015 चे पत्र क्र. नमुंमपा/क्रीडा व सांस्कृ/564/2015 |
| **ठराव क्र. 758.**<br>**दिनांक 20 जानेवारी 2016** | आयुक्तांचे दिनांक 18/01/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/ क्रीडा व सांस्कृ./61/2015 च्या पत्रामध्ये केलेले फेरबदल लक्षात घेता, FIFA UNDER-17 WORLD CUP INDIA 2017 करिता महानगरपालिकेच्या अखत्यारित्यातील यशवंतराव चव्हाण सेक्टर-19, नेरुळ हे मैदान विकसित करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. 1 कोटी, 91 लाख मात्र इतक्या खर्चास, व सदरचे अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान करण्यास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकिय मंजुरी देण्यात यावी |
| **निर्णय -** | **मंजूर.** |
| **विषय क्र. 11.**<br>**दिनांक 20 जानेवारी 2016** | अग्निशमन विभागासाठी नवीन वाहने व यंत्रसामुग्री खरेदी करणे या कामाच्या सुधारीत खर्चास मा. महासभेची सुधारीत प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबतच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 04/01/2016 चे पत्र क्र. जा.क्र./अग्नी/मुख्यालय/वाशी/89/2016. |
| **ठराव क्र. 759.**<br>**दिनांक 20 जानेवारी 2016** | अग्निशमन विभागासाठी नवीन वाहने व यंत्रसामुग्री खरेदी करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. 4 कोटी, 07 लाख, 69 हजार, 541 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, सुधारित प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी |
| **निर्णय -** | मंजूर |

| | |
|---|---|
| **विषय क्र. 12.**<br>**दिनांक 20 जानेवारी 2016** | ठाणे-बेलापूर रोडवरील राबाडा तलावाजवळ फुटओव्हर ब्रिज (FOB) बांधण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 12/01/2016 चे पत्र क्र. जा.क्र./श.अ./21/2016. |
| **<u>ठराव क्र. 760.</u>**<br>**दिनांक 20 जानेवारी 2016** | ठाणे-बेलापूर रोडवरील राबाडा तलावाजवळ फुटओव्हर ब्रिज (FOB) बांधण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. 1 कोटी, 41 लाख, 11 हजार, 200 मात्र इतक्या खर्चास, नियमानुसार देय असलेल्या भाववाढीपोटी वाढीव रक्कमेस, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी. |
| **निर्णय -** | <u>मंजूर</u> |
| **विषय क्र. 13.**<br>**दिनांक 20 जानेवारी 2016** | नामकरण ठरावातील अंशत: बदल करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 12/01/2016 चे पत्र क्र. जा.क्र./प्रशा/जसं./102/2016. |
| **<u>ठराव क्र. 761.</u>**<br>**दिनांक 20 जानेवारी 2016** | नवी मुंबई महानगपालिकेच्या वतीने नेरुळ येथील माता बाल रुग्णालयांच्या जागी 100 कॉटस क्षमतेचे सर्वसाधारण रुग्णालय उभारण्यात आले असून या रुग्णालयास यापुढे "मॉसाहेब मिनाताई ठाकरे रुग्णालय" व ऐरोली येथील माता बाल रुग्णालयांच्या जागी 100 कॉटस क्षमतेचे सर्वसाधारण रुग्णालय उभारण्यात आले असून या रुग्णालयास यापुढे "राजमाता जिजाऊ रुग्णालय" असे नामकरणातील अशंत: बदल करण्यास, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी. |
| **निर्णय -** | <u>मंजूर</u> |
| **विषय क्र. 14.**<br>**दिनांक 20 जानेवारी 2016** | वैद्यकिय अधिकारी या संवर्गातून सहाय्यक आरोग्य अधिकारी या संवर्गात पदोन्नती देण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 13/01/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/प्रशासन/आस्था-2 /प्र.क्र. 99/119/2016. |
| **<u>ठराव क्र. 762.</u>**<br>**दिनांक 20 जानेवारी 2016** | वैद्यकिय अधिकारी, डॉ. रमेश धर्मा निकम यांना वैद्यकिय अधिकारी (वेतनबँड रु. 15600-39100 ग्रेड वेतन रु. 5400) या संवर्गातून सहाय्यक आरोग्य अधिकरी (वेतनबँड रु. 15600-39100 ग्रेड वेतन रु. 6600) या संवर्गात खुल्या प्रवर्गाच्या रिक्त 01 पदावर तसेच सदर पदास शासन मान्यता मिळणेच्या अधिन राहून सन मार्च 2003 पासून पदोन्नती देण्यास, प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 53(1) अन्वये, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी |
| **निर्णय -** | <u>मंजूर</u> |

| | |
|---|---|
| **विषय क्र. 15.**<br>**दिनांक 20 जानेवारी 2016** | उप अभियंता (स्था./पा.पु.) या संवर्गातून कार्यकारी अभियंता या संवर्गात पदोन्नती देण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 13/01/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/प्रशासन/आस्था-2 /प्र.क्र. 45/120/2016 |
| **<u>ठराव क्र. 763.</u>**<br>**दिनांक 20 जानेवारी 2016** | उप अभियंता (स्था./पा.पु.), श्री. मनोहर आनंदा सोनवणे यांना उप अभियंता (स्था./पा.पु.), (वेतनबँड रु. 15600-39100 ग्रेड वेतन रु. 5400) या संवर्गातून कार्यकारी अभियंता (वेतनबँड रु. 15600-39100 ग्रेड वेतन रु. 6600) या संवर्गात अ. जाती या प्रवर्गाच्या रिक्त शासनमान्यता मिळणेच्या अधिन राहून पदोन्नती देण्यास, प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 53(1) अन्वये, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी |
| **निर्णय -** | <u>मंजूर</u> |
| **विषय क्र. 16.**<br>**दिनांक 20 जानेवारी 2016** | नवी मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील निवासी वैद्यकिय अधिकारी या संवर्गात विकल्पाद्वारे नामनिर्देशनाने नेमणूक देण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 13/01/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/प्रशासन/आस्था-1 /प्र.क्र. 374/121/2016. |
| **<u>ठराव क्र. 764.</u>**<br>**दिनांक 20 जानेवारी 2016** | नवी मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील बालरोग तंज्ञ, डॉ. हरविंदर हरदिप सिंग यांना निवासी वैद्यकिय अधिकारी, (वेतनबँड रु. 15600-39100 ग्रेड वेतन रु. 6600) या संवर्गात सदर पदाकरिता आवश्यक असलेली अर्हता शिथिल करुन खुला प्रवर्गाच्या रिक्त शासनमान्य पदावर विकल्पादवारे नामनिर्देशनाने नेमणूक देण्यास, प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 53(1) अन्वये, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी |
| **निर्णय -** | <u>मंजूर</u> |
| **विषय क्र. 17.**<br>**दिनांक 20 जानेवारी 2016** | वैद्यकिय अधिकारी/अपघात वैद्यकिय अधिकारी या संवर्गातून कुंटुंब कल्याण अधिकारी, शहर हिवताप अधिकारी व शहर क्षयरोग अधिकारी या संवर्गात नामनिर्देशनाने नेमणूक देण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 13/01/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/प्रशासन/आस्था-1 /प्र.क्र. 46/122/2016. |

| | |
|---|---|
| **ठराव क्र. 765.**<br>**दिनांक 20 जानेवारी 2016** | नवी मुंबई महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांची शैक्षणिक अर्हता व पुर्व अनुभव व सेवाजेष्ठता लक्षात घेता, डॉ. श्रीम. धनवंती घाडगे, अपघात वैद्यकिय अधिकरी, डॉ. श्रीम. रत्नप्रभा पुकार, अपघात वैद्यकिय अधिकरी, व डॉ. श्री. दयानंद कटके, वैद्यकिय अधिकरी यांना अनुक्रमे कुटुंब कल्याण अधिकारी, शहर क्षयरोग अधिकारी व शहर हिवताप अधिकरी (स.वे. आयोगानुसार वेतनबँड रु. 15600-39100 ग्रेड वेतन रु. 6600) या पदांवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील अनुसुची ड मधील प्रकरण 3 मधील 1(2) च्या परंतुकातील तरतुदीनुसार तसेच सदरच्या पदास शासनमान्यता मिळणेच्या अधिन राहुन खुला प्रवर्गाच्या रिक्त पदांवर नामनिर्देशनाने नेमणूक देण्यास, प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 53(1) अन्वये, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी |
| **निर्णय -** | मंजूर |